
# महिला सक्षमीकरण: स्वरूप आणि विकास

संपादक

प्रा. पांडूरंग मुट्ठे



Scanned by CamScanner

४५. नोकरी करणा-या स्त्रियांना येणा-या अडचणींचा शोध एक अभ्यास ........ २३३
**डॉ.सौ.शैला भगवान सारंग, गोडभरले उषा बाबूराव**

*** महिला नेतृत्त्वा समोरील आव्हाने आणि अडचणी**

४६. महिला नेतृत्व - समस्या व उपाय .............................................. २३७
**प्रा. बी.पी. पवार**

४७. महिला सक्षमीकरण : अडथळे व उपाय .......................................... २४०
**डॉ.शिवाजी नारायणराव सोनटक्के**

४८. महिला सबलीकरण : आव्हाने आणि यशस्वीता .............................. २४३
**प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव**

***अनुसुचित जाती - जमाती व भटक्या विमुक्त जातीतील स्त्रीचे जीवन आणि समस्या**

४९. माडीया गोंड जमातीतील स्त्रीयांची जीवनपध्दती: एक दृष्टिकोन ............ २४९
**प्रा.डॉ. सुरेश वि. धनवडे**

५०. भटक्या वडार समाजातील स्त्रीयांची सध्यस्थिती व समस्या ................ २५३
**प्रा.पांडूरंग राजाराम मुट्ठे**

५१. भारतातील आदिवासींची सद्यस्थिती आणि आदिवासी स्त्रीयांच्या समस्या .. २६०
**प्रा. संध्या कदम**

५२. आदिवासी जमातीतील स्त्री दर्जा / स्थिती .......................................... २६४
**प्रा.व्ही.एम.पटवारी, प्रा.एल.बी.दळवे, प्रा.जे.डी.पवार**

५३. स्त्रियांचे बौध्द धम्मातील स्थान ................................................... २६९
**प्रा.एस.आर.शेळके**

५४. भारतीय समाजातील महिलांचा दर्जा ............................................... २७३
**प्रा.डॉ. विनोद जाधव, पांडुरंग माणिकराव देशमुख**

५५. अनुसूचित जाती, जमाती व भटक्या विमुक्त जातीतील ...................... २८०
स्त्रियांचे जिवन आणि समस्या
**प्रा. मरगीळ गजानन बाबुराव**

५६. भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान ................................................. २८९
**प्रा.संजय भिमराव तोंडारकर**

*** पंचायतराज व्यवस्थेत स्त्रीयांचा सहभाग**

५७. पंचायतराज व्यवस्थेत स्त्रीयांचा सहभाग अपेक्षा आणि वास्तव ............. २९२
**डॉ. चौकटे प्रकाश प्रल्हादराव**

Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

४८.

# महिला सबलीकरण : आव्हाने आणि यशस्वीता

**प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय,देगलूर ता.देगलूर जि.नांदेड

स्त्रियांची सामाजिक, राजकिय, आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या प्रक्रिये संदर्भाने महिला सबलीकरण हा शब्दप्रयोग मागील एका दशकापासून केला जातो. भारताच्या स्वातंत्र्यानंतर विविध शासकीय कार्यक्रम आणि योजनामधुन महिला सबलीकरणाचे प्रयत्न होत आहेत. मात्र १९८० च्या दशकानंतर त्या जागी महिला विकास हा शब्दप्रयोग अधिक प्रचलित झालेला दिसतो. कालांतराने १९९० च्या दशकातील पहिल्या वर्षामध्ये महिलांना समान अधिकार देण्यावर अधिक भर देण्यात येवू लागला. १९९० च्या दशकात अंतिम काळात आणि २१ व्या शतकात प्रवेश करताच महिला सबलीकरणाचे नारे अधिक गतीमान
झाले. या संकल्पनेचा शाब्दीक अर्थ समजून घेतल्यास त्यांची महतता अधिक स्पष्ट होते.

महिला सबलीकरण ही एक व्यापक व अर्थपुर्ण संकल्पना आहे. यात स्त्रियांचे अधिकार व शक्तींचे स्वाभाविकपणे समायोजन झाले. सबलीकरण ही एक मानसिक अवस्था आहे. जी अधिक प्रमाणात अंतर्गत क्षमता आणि शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. परिस्थितीवर आधारित आहे. ज्यासाठी समाजात आवश्यक कायदे, सुरक्षात्मक तरतूद आणि त्याची अंमलबजावणी करणारी पुरक व सक्षम प्रशासकीय व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे.

महिला सबलीकरणाच्या संकल्पनेत महिलांना सर्वसंपन्न किंवा विकसित होण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध करुन दिली जाते. ज्यात नवनवीन पर्याय तयार असतील. स्त्रियांना जेवण , पाणी, घर, शिक्षण, आरोग्य, सुविधा, शिशु पालन, नैसर्गिक संसाधने, बँकिग सुविधा, कायदा अधिकार आणि प्रतिभा इत्यादींच्या विकासासाठी पर्याप्त रचनात्मक संधी देण्याचा समावेश असतो.

## महिला सबलीकरणाची राष्ट्र निर्मितीत भुमिका :

महिला आमच्या लोकसंख्येचा जवळपास अर्धा हिस्सा आहेत. त्यामुळे राष्ट्र विकासाच्या



Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

महान कार्यात महिलांची भूमिका किंवा योगदानास योग्य पध्दतीने समजुन घेवुनच राष्ट्र निर्मितीच्या कार्यास समजुन घेता येईल. संपूर्ण मानवी सभ्यतेत व्यापक बदल घडुन आणणारा एक महत्वपुर्ण घटक म्हणुन महिला सबलीकरणाचे आंदोलन २० व्या शतकातील शेवटच्या दशकातील एक महत्वपुर्ण राजकीय आणि सामाजिक विकास म्हणवता येईल. वास्तवतेत राष्ट्र निर्माण ही एक जटील व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. जी सुव्यवस्थीत पध्दतीने तयार करण्यात आलेल्या विकास धोरणांना व राजकीय इच्छा शक्तीला व्यक्त करते. ज्यामुळे प्रत्येक व्यक्ति आपल्या पुर्ण क्षमतांचा वापर करुन कार्यक्षमतेत वाढ करतो. त्यासाठी आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक पायाभूत आधार मजबुत असणे गरजेचे आहे. नागरिकांच्या समृध्दी किंवा जीवनात गुणात्मक बदल करुन मानवी विकासाचे मुलभुत ध्येय गाठणे आमच्या राष्ट्र निर्माण प्रक्रियेचा अत्यंत महत्वपुर्ण भाग आहे.

**भारत आणि महिला सबलीकरण :**

भारतात महिलांच्या सबलीकरणासंबंधीत अनेक मुलभूत बदल करण्यात आले. प्रथम घटनात्मक हक्क व नंतरच्या कायदयातुन सुरक्षितता उपलब्ध करुन देण्यासाठी अनेक पाऊल उचलण्यात आले. स्वातंत्र्यापासुनच महिलांच्या विकासाचा मुद्दा भारतीय विकास प्रक्रियेतील केंद्रीय विषय राहिला आहे. मागील २५ वर्षातील धोरणात अनेक बदल झाले. १९७० च्या दशकात महिलांचे कल्याण तर २० व्या शतकात विकासावर भर देण्यात आला. १९९० च्या दशकापासुन महिला सबलीकरणावर भर दिला जात आहे. महिलांचे निर्णय निर्धारण प्रक्रिया व धोरण निर्धारणात सहभागीत्व असावे यासाठी पुरक निर्णय होत आहेत. महिला सबलीकरणासाठी सामुहिकरित्या प्रयत्न झाल्यासच महिलांमध्ये सत्तेची उर्जा जागृत होते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. शोषणास विरोध करण्याची क्षमता व इच्छेत वाढ होते. परंतु व्यापक अर्थाने विचार करता सामुहिक कार्यवाही सबलीकरणाचा एक मार्ग आहे. त्याच्या साह्यानेच स्त्री-पुरुष विषमतेला आव्हान देता येते. तसेच त्यास समाप्त करण्याचे प्रयत्न करता येतात. विचार, धर्म, श्रध्दा आणि अध्यात्मिक स्वातंत्र्यासोबतच महिलांच्या प्रगतीसाठी होणाऱ्या या वयैक्तीक व सामुहिक प्रयत्नाने महिलासोबतच पुरुषांचा ही नैतिक, अध्यात्मीक आणि बौध्दिक आवश्यकतांची पुर्तता होते. त्यातुन महिलांची समाजातील पुर्ण क्षमतेच्या वापराची शक्यता स्पष्ट होते. आपल्या कल्पनेनुसार स्वत:च्या जिवनास पुर्ण रुप देण्याचा विश्वास निर्माण होतो.

वास्तवेत महिला सबलीकरण महिलांमध्ये स्वत:च स्वत:ला संघटित करुन आपली क्षमता वाढवणे व त्यास सदृढ करणारी एक प्रक्रिया आहे. त्या लिंग, सामाजिक, आर्थिक स्थिती आणि कुटूंबातील व समाजातील भुमिकेच्या आधारावर निर्धारित संबंधाना नजर अंदाज



Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

करुन आत्मबल विकसीत करतात.

२००१ हे वर्ष भारत सरकारने महिला सक्षमीकरण वर्ष म्हणुन घोषीत केले. ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणुन साजरा केला जातो. भारतीय शासनाने मानव संसाधान विकास मंत्रालयाच्या सहकार्याने देशातील महिलांच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक विकासात समान भागीदारीस संधी मिळावी या उद्देशाने राष्ट्रीय महिला विकास धोरण - २००१ ची घोषणा केली. ज्यातील कांही तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

१) उपलब्ध कायदात संशोधन करुन महिलांच्या गरजां प्रति संवेदनशील राहुन आणि कौटूंबीक हिंसाचार व वयैक्तीक आक्रमणास रोखण्यासाठी नवीन कायदयाची निर्मिती व अपराध्यास योग्य शिक्षा देण्याची व्यवस्था करण्यात आली.

२) महिलासोबतचा भेदभावयुक्त व्यवहार समाप्त करणे. त्यासाठी धार्मिक नेत्यांची संपूर्ण भागीदारी मिळवणे. विवाह, घटस्फोट यासारख्या वैयक्तीक कायदयात बदल करणे.

३) महिलांना पुरुषासमान अधिकार देण्यासाठी त्यांशी संबंधित कायदयात बदल करण्यात येईल.

४) महिलांना मुख्य प्रवाहात आणणाऱ्या साधनांचे वारंवार मुल्यांकन करण्यांसाठी समन्वय आणि प्रबंधन साधनांची निर्मिती करणे.

५) गरीब महिलांना आर्थिक सहाय्य करणारे कार्यक्रम चालवणे उदा. व्यवसायासाठी कर्ज देणे. सामाजिक - आर्थिक विकासात उत्पादक व कार्यकर्ता म्हणुन महिलांच्या योगदानास मान्यता देणे.

६) सर्व निर्णायक घटक, संस्थामध्ये निर्णय निर्धारण प्रक्रियेत महिलांच्या सहभागास सुनिश्चित करण्यात आले.

७) जागतिकीकरणातुन उत्पन्न नकारात्मक आणि सामाजिक किंवा आर्थिक प्रभावाविरुध्द महिलांच्या क्षमतेत वाढ करणे तसेच त्यांना संपुर्ण सुरक्षा प्रदान करणे.

८) महिलांचा शैक्षणिक स्तर सुधारण्यास पुरक शिक्षण प्रणाली निर्माण करण्यासाठी विशेष नियम लागु करने. महिलांचे आरोग्य, आहार, बालविवाह आणि विवाहाच्या नोंदीस अनिवार्य करने.

९) गावात आणि शहरातील धोरणात व योजनांमध्ये महिलांना सहभागी करुन घेणे.

१०) पर्यावरण संरक्षण व खुशहाली संबंधीत कार्यक्रमात महिलांना सहभागी करुन घेणे.

११) विज्ञान आणि उद्योगाच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महिलांना प्रोत्साहन देणे.

१२) बाल मुलींचा देह व्यापार, स्त्रीभुषण हत्या, बाळंतपणा अगोदर लिंगचाचणी, बालशोषन, बालविवाह, बाल वेश्या वृत्तिस रोखण्यासाठी सशक्त कायदे करणे.

Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

१३) महिला प्रगतीची आशा असणाऱ्या केंद्रीय आणि राज्य स्तरावरील वर्तमान संस्थात्म तंत्रास अधिक मजबुत करण्यात येईल.

१४) महिला प्रगती हेतु संबंधित योजनांमध्ये सहाय्यतेसाठी खाजगी क्षेत्रात आर्थिक गुंतवणुकी प्रयत्न केले जातील. या शिवाय आर्थिक कर्ज देणाऱ्या संस्था अतिरिक्त कायदे बनवण्या कार्य करने.

१६) पंचायती राज्य संस्था आणि स्थानिक स्व-शासन सुव्यवस्थित रुप देणे.

सर्व केंद्रीय आणि राज्य मंत्रालय, केंद्रीय व राज्य महिला व बाल कल्याण विभा आणि राष्ट्रीय महिला आयोगांसोबत विचार विनिमयातुनच धोरण ठरतील. त्यात बदल करण्याचे योजना तयार करतील.

**भारतीय घटस्फोट अधिनियम २००१ :**

घटस्फोट प्रकरणात ख्रिश्चन धर्मात पुरुषांच्या बरोबरीने महिलांना अधिकार देण्याबाबत तरतुद करण्यासंबंधी भारतीय घटस्फोट अधिनियम २००१ संपूर्ण देशात ३ ऑक्टोंबर २००१ पासुन लागु करण्यात आला. या कायदयानुसार १३२ वर्ष जुन्या भारतीय घटस्फोट अधिनियम १८६९ मध्ये संशोधन करुन, त्यातील कलम १०, १७ आणि २० मध्ये महिला आणि पुरुषांच्या प्रकरणास एकरुपता देण्यात आली.

**कौटूंबिक हिंसाचार अधिनियम २००१ :**

कोणत्याही व्यक्तिसोबत होणारा हिंसात्मक व्यवहार हा गुन्हेगारी कायदयाअंतर्गत येतो. तरीही १९८३ पासुन देशात कौटूंबिक हिंसाचारास एक समस्या म्हणुन मान्यता देण्यात आली. विवाहीत महिले सोबतच्या क्रुरतेस अपराध मानण्यात आले. ज्यास हुंडा हत्येशी जोडण्यात आले. तरीही त्यामुळे दुसऱ्या कारणास्तव स्त्रियांप्रति होणाऱ्या हिंसेस नजर अंदाज करण्यात आले. या विधेयकाने त्या कमतरतेस दुर करण्याचे प्रयत्न केले. ज्या अंतर्गत पिडीत महिलेस न्यायालयाकडून आदेश मिळवणे व पिडीत महिलेला सासरच्याकडुन घरातुन हाकलुन देण्यात येवु नये असा अधिकार मिळाला. न्यायालयीन प्रकरणाच्या खर्चासंदर्भात आर्थिक सहाय्य करण्यासाठीची मागणी करता येते.

निराधार महिलांना त्यांची गुजरान व्हावी म्हणुन आर्थिक सत्ता मिळवुन देणारे अधिनियम २००१. स्त्रीयांच्या शिक्षणास प्राधान्य देण्यात यावे या हेतुने बाल महिला अनिवार्य शिक्षण विधेयक २००१. स्त्री भुषण हत्या रोकण्यासाठीचे अधिनियम करण्यात आले. तसेच २००१ पासुन देवी अहिल्याबाई होळकर पुरस्कार, राणी लक्ष्मीबाई पुरस्कार, माता जीजाबाई पुरस्कार, कणगी पुरस्कार, ई. पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महिला सबलीकरणाच्या दिशेने अनेक टास्क फोर्स, दे केअर, जेण्डर डव्हलपमेंट



Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

इन्डेक्स तयार करण्याच्या सुचना, डी.डब्ल्यु, सी.डी.डब्लु आणि आई एस.आर.ओ.च्या साह्याने २००१ पासुन निसटेनस एज्युकेशन संकल्पना, यौन उत्पीडन रोखण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर समितीचे गठन, गरीब महिलांना आर्थिक क्षेत्रात फायदा म्हणुन स्टॉप कार्यक्रम, वार्षिक आर्थिक सर्वेक्षणात लैंगिक विषमते संदर्भात जोडण्यात आलेला अध्याय ई. योजना बनवण्यात आल्या आहेत.

महिला आर्थिकदृष्टया सक्षम झाल्याशिवाय महिला सबलीकरण होत नाही. त्यामुळे शासकीय स्तरावर महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कांही नवीन योजनांची घोषणा तयार करण्यात आली. ज्यात न्यु मॉडेल चरखा योजना , (१९८७), नौराद प्रशिक्षण योजना (१९८९), महिला समारव्या योजना (१९८९), मातृ आणि शिशु आरोग्य कार्यक्रम (१९९२), राष्ट्रीय महिला, कोषाची कर्ज योजना (१९९३), कर्ज प्रोत्साहन योजना (१९९३), राष्ट्रीय मातृत्व लाभ योजना (१९९७), ग्रामीण महिला विकास परियोजना (१९९६), राज राजेश्वरी बीमा योजना (१९९७) स्वास्थ सखी योजना (१९९७) याशिवाय कुमारी शक्ति योजना, महिला स्वंय सिध्द योजना , महिला स्वास्थ योजना ई.

महिला सबलीकरण चळवळीत मुलभूत बदल झाला. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महिला राजकीय शक्ति म्हणुन पुढे येत आहेत. अनादीकाळापासुन रुढी प्रथा व परंपरेच्या दबावात असणारी महिला एकाएकी सक्षम होणार नाही. परंतु त्यासाठी शासनामार्फत झालेल्या प्रयत्नातुन ते कांही प्रमाणात शक्य झाले. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ आणि नोबल पुरस्कार विजेते प्रा.अमर्त्य सेन हे इंडिया इकॉनॉमिक डेव्हलपमेंट एण्ड सोशल अपॉर्च्युनिटी या पुस्तकात म्हणतात. महिला सबलीकरणामुळे फक्त महिलांच्याच जीवनात सकारात्मक बदल होणार नाही. तर पुरुष आणि बालकांच्याही जीवनास फायदा मिळेल. महिलां शिक्षणामुळे मुलगा आणि मुलगी या दोघांच्या बालमृत्यु प्रमाणात कमतरता आली. उत्तर भारत, केरळ मध्ये मुलगा व मुलगीच्या आयुर्मानात कमतरता येण्यास महिलांचे साक्षरता हे एक कारण आहे.

भारतीय समाजातील महिलांच्या दुर्बल स्थितीमुळेच तीला दुर्व्यवस्थेत योग्य पध्दतीने दुर करण्यात यश मिळत नाही. अशा प्रकारे महिलांच्या माध्यमातुन बालिका आणि वयोवृध्द महिला, दोघांच्या जीवनात सुख व समृध्दी निर्माण करता येते. १९८० ला युनोच्या कोपनहेगन विश्व संम्मेलनातील एका रिपोर्टनुसार जगातील वयस्क लोकसंख्येचा जवळपास ५०% महिला आहेत. जगातील अधिकाधिक श्रम शक्तित महिलांचा वाटा १/३ च्या जवळपास आहे. परंतु एकुण घटयांचा विचार करता त्यात २/३ महिलांचा वाटा आहे. परंतु त्यांना जगातील एकुण उत्पननाच्या फक्त १० वा भाग मिळतो. जगातील एकुण संपतिच्या १% पेक्षा ही कमी संपत्तीची मालकी महिलांकडे आहे.

Scanned by CamScanner

ISBN 978-93-5240-041-6

महिलांच्या सबलीकरणाविषयी अखंडितपणे चर्चा सुरु आहे. बेरच कायदे स्त्रीयांच्याच बाजुने आहेत, अशी ही ओरड समाजातुन होते. नव्या जागतिक व्यवस्थेत मुस्लीम राष्ट्रांत महिलांची अवस्था चिंतनीय आहे. दहशतवादाच्या दिशेने मलिांचे आकर्षण वाढत आहे. घरापासून ते ऑफिसपर्यंत महिलांकडे शोषणाच्या नजरेने पाहणाऱ्या प्रवृत्तीस आळा घालण्या इतपत लोकशाही सक्षम झाली. स्वातंत्र्यानंतरच्या ६८ वर्षानंतरही महिला सक्षमीकरणाबाबत नकारात्मक चर्चा होते. कदाचित स्वातंत्र्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या हिंदु कोड बिल ची व्यवस्थित अंमलबजावणी झाली नाही. महिलांमध्ये अधिकाराच्या मागणीची चळवळ सशक्त झाली. पण त्याच्या वापराचा विचार करता त्या पुरुषप्रधान व्यवस्थेला बळी पडल्याचे स्पष्टपणे जाणवते.

महिला सबलीकरण ही विकासशील प्रक्रिया आहे. त्यामुळे त्याच्या यशस्वीतेला वेळ लागतो. परंतु स्वातंत्र्यापासुन आजपर्यंतचा महिला सबलीकरणाचा आलेख जगातील इतर राष्ट्रांच्या तुलनेत समाधानकारक आहे. स्वातंत्र्यापासुनच सर्व हक्क घटनेने महिलांना दिले. महिलेने पंतप्रधान व राष्ट्रपती पद मिळवले. शास्त्रज्ञ, प्राध्यापक, वकील, इंजिनियर, डॉक्टर, उद्योगपती खेळाडू, व्यावसायिक, राजनय, सॉफ्टवेअर व हार्डवेअर इंजिनियर , टुरिझम, ड्रायव्हर, लेखनिक, IAS, IPS, IFS, ऑफीसर, प्रशासन व राजकारण या सर्व क्षेत्राला आपल्या कर्तृत्वाने काबिज केले. आर्थिक संपन्नता वाढली. देशाच्या अर्थव्यवस्थेला मजबुत करण्यातील योगदान पुरषासमान आहे. स्वंयसेवी संस्था, बचत गट व नागरी समाजाच्या यशस्वीकरणात वाटा वाढत आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) डॉ.गवाणकर रेहिणी - भारतीय स्त्री शक्तीचे राजकारणी रुप.

२) गीता साने / श्री पु.भागवत - भारतीय स्त्री जीवन - मौज प्रकाशन गृह, मुंबई.

३) विद्युत भागवत - अरुण पारगांवकर - स्त्री प्रश्नांची वाटचाल - प्रतिमा प्रकाशन पुणे.

४) आपटे ज.श. रोडे पुष्पा - भारतीय महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१२

५) डॉ.ज्योती लांजेवार, भारतीय समाज आणि स्त्री - सुगावा प्रकाशन, पुणे.


✲ ✲ ✲

Scanned by CamScanner